**Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies,**
*Online ISSN 2278-8808, SJIF 2018 = 6.371, www.srjis.com*
*PEER REVIEWED & REFERRED JOURNAL, JULY-AUG, 2019, VOL- 7/52*

# शालेय स्तरावर सांघिक अध्यापन वापर एक अभ्यास

**प्रा. प्रकाश अ. जगताप, Ph. D.**

***टिळक शिक्षण महाविद्यालय, पुणे***

**Abstract**

***प्रस्तुत संशोधकाने शिक्षकांकडून शालेय स्तरावर सांघिक अध्यापनाचा वापर याचा अभ्यास केला. या अभ्यासासाठी न्यायदर्शचा आकार ६० होता. शालेय स्तरावरील शिक्षकांकडून सांघिक अध्यापन तंत्राचा वापर किती प्रमाणात केला जातो याचा शोध घेण्यासाठी प्रश्नावली द्वारे माहिती जमा केली. त्या माहितीचे विश्लेषण अर्थनिर्वचन केले व त्यावरून निष्कर्ष काढले त्याआधारे काही शिफारसी केल्या.***

*Scholarly Research Journal's is licensed Based on a work at www.srjis.com*

**प्रास्ताविक**

**अध्ययन आणि अध्यापन या प्रक्रिया एकमेकांवर अवलंबून आणि पूरक आहेत. अध्यापन अध्ययन प्रक्रियेस योग्य दिशा देते. अध्यापनतून अद्यावत प्रकारचे ज्ञान देता येते. संशोधनाअंती अध्यापनाची विविध नवीन तंत्र आज उपलब्ध आहेत. त्या तंत्रांच्या साहयाने अध्ययन थोड्या कालावधीत अधिक करता येणे शक्य आहे. अध्यापन अधिक परिणामकारक करता येते. त्यात सांघिक अध्यापनाचा विचार होतो. सांघिक अध्यापनामुळे विद्यार्थी अवधान टिकवून ठेवता येते. अध्ययनास पोषक वातावरण वर्गात निर्माण करता येते. आपल्या शाळांमध्ये शिक्षक संघ अध्यापन तंत्राचा वापर फारच अल्प प्रमाणात करतात. मूलतः हे तंत्र शालेय शिक्षकांना माहिती आहे का ? हे तंत्र वापरण्या विषयीची जागरूकता शिक्षकांमध्ये आहे का ? हे तंत्र वापरण्यासाठी सकारात्मकवृत्तीने प्रयत्न करतात का ? या बाबींचा विचार या लेखात केला आहे.**

**संघ अध्यापन संकल्पना**

**एक विषय आपल्या कौशल्य विषेशाप्रमाणे अनेक शिक्षकांनी एकत्र येऊन केलेले अध्यापन म्हणजे संघ अध्यापन होय.**

**संघ अध्यापनामध्ये काही शिक्षक गट करून कमीत कमी दोन शिक्षक आणि जास्तीत जास्त पाच शिक्षक गट करून पाठाचे नियोजन, प्रत्यक्ष अध्यापक प्रस्तावना ते गृहपाठ या सर्व पायऱ्या विद्यार्थ्यांच्या एकाच वर्गात, एकाच वेळेस राबवतात.**

*Copyright © 2017, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

**संघ अध्यापनात एकाच शाळेत शिकवणारे एकाच वर्गाला शिकवणारे विविध कौशल्यात तज्ञ असणारे एकावेळी अध्यापन नियोजन व प्रत्यक्ष अध्यापन व मूल्यमापन या सर्व गोष्टी एकत्र करु शकणारे शिक्षक सहभागी असतात.**

**संघ अध्यापन वैशिष्ट्ये**

1. **एका वर्गात एका गटाला दोन किंवा दोनपेक्षा अधिक शिक्षक अध्यापन करतात.**
2. **संघ अध्यापनात संघ अध्यापन करतो त्याच्या समन्वय असतो.**
3. **संघ अध्यापनात शिक्षक एकत्र येऊन विचार विनिमय करून अध्यापन करतात.**
4. **संघ अध्यापनात अध्यापन, नियोजन एकत्र केले जाते. शिक्षक आपले कौशल्य, तज्ञांना त्यानुसार अध्यापन मुद्दे निश्चित करतात.**
5. **संघातील सर्व शिक्षक प्रशिक्षित असतात.**
6. **संघ अध्यापनात संघाकडून एकावेळी एकाच वर्गात अध्यापन प्रक्रिया पार पाडली जाते.**

**संघ अध्यापन प्रकार**

**१. श्रेणीबद्ध प्रभाव**

**श्रेणीबद्ध प्रभावात एक शिक्षक मुख्य भूमिका ठेवतो. तो विषय तज्ञ असतो. आणि संघातील इतर शिक्षक हे कौशल्य शिक्षक, विषय प्रभुत्व शिक्षक, प्रभावी अध्यापन पद्धती शिक्षक, सहाय्यक शिक्षक इत्यादी असतात.**

**२. समप्रभावी संघ अध्यापन**

**संघातील सर्व शिक्षक हे सर्व क्षमता, गुणवैशिष्ट्ये, विषयज्ञान या बाबतीत समान असतात. कोणीही जेष्ठ अथवा कनिष्ठ असा भेदभाव नसतो. पाठ्य घटक निश्चिती नियोजन, प्रत्यक्ष अध्यापन मूल्यमापन या सर्व पायऱ्या मध्ये ते समान भाग घेतात. त्याला समप्रभावी संघ अध्यापन म्हणतात**

*Copyright © 2017, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

**संशोधन महत्व**

संघ अध्यापनात तंत्र हे नाविन्यपूर्ण अध्यापनासाठी महत्त्वाचे आहे. संघ अध्यापन तंत्र हे परिणामकारक अध्यापनासाठी महत्त्वाचे आहे. संघ अध्यापन तंत्रामुळे योग्य अध्ययन अनुभव देता येतात. विद्यार्थ्यांना या तंत्रामुळे आशय लवकर समजण्यास मदत होते. विशेष महत्त्वाची बाब विद्यार्थ्यांचे ज्ञान दृढीकरण होते. अध्यापन एकसुरी होत नाही. कंटाळवाणे अध्यापन होत नाही. संघ अध्यापन असल्यामुळे संघातील प्रत्येक शिक्षक तयारीनिशी अध्यापनात सहभागी होईल. संघ अध्यापन तंत्राची संकल्पना स

मजण्यास मदत होईल. संघ अध्यापन तंत्र वापरण्याविषयी जागृकता निर्माण होण्यास मदत होईल.

**उद्दिष्टे**

1. शालेय स्तरावर संघ अध्यापन तंत्राच्या वापराचा शोध.
2. संघ अध्यापन तंत्र वापरण्याविषयी जागृकता शोध घेणे.
3. संघ अध्यापन तंत्र विषयी शिक्षकांच्या सकारात्मक दृष्टीकोनाचा शोध.

**संशोधन व्याप्ती**

1. सदर संशोधन शालेय स्तरावरील शिक्षकांपुरते व्याप्त आहे.
2. प्रस्तुत संशोधन पुणे शहरातील शाळांपुरते मर्यादित आहे.
3. सदर संशोधन हे शालेय शिक्षकांच्या संघ अध्यापन तंत्रापुरते व्याप्त आहे.

**मर्यादा**

1. शालेय शिक्षकांनी माहिती संकलन साधनात दिलेल्या प्रतिसादावर संशोधनाचे निष्कर्ष अवलंबून राहतील.
2. प्रस्तुत संशोधन पुणे शहरातील मराठी माध्यमाच्या शिक्षकांशी संबंधित आहे.

**संशोधन पद्धत**

प्रस्तुत संशोधन विषयाचा अभ्यास करण्यासाठी सर्वेक्षण पद्धतीचा वापर करण्यात आला आहे.

**संशोधन साधने**

प्रस्तुत संशोधनामध्ये संघ अध्यापन तंत्र प्रश्नावली या साधनाचा वापर केला आहे.

*Copyright © 2017, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

**नमुना निवड पद्धत**

**संभाव्य नमुना निवड पद्धतीतील सुगम यादृच्छिक पद्धती व त्यातील लॉटरी पद्धतीचा वापर नमुना निवड करण्यासाठी केला आहे.**

**संख्याशास्त्रीय तंत्र**

**संघ अध्यापन तंत्र प्रश्नावली द्वारे माहितीमुळे संकलन केले त्या माहितीचे संख्याशास्त्रीय अर्थ निर्वाचानासाठी शेकडेवारीचा वापर केला आहे.**

**निष्कर्ष -**

1. **शालेय शिक्षकांत संघ अध्यापन परिचितता असण्याचे प्रमाण समाधानकारक आहे.**
2. **शालेय स्तरावरील शिक्षकांना संघ अध्यापन प्रकार माहिती असण्याचे प्रमाण असमाधानकारक दिसून आले.**
3. **संघ अध्यापनासाठी शिक्षक पुढाकार घेण्याचे प्रमाण अल्प दिसून आले.**
4. **संघ अध्यापनासाठी शिक्षक एकत्र येऊन शिकवण्याची तयारी दाखवण्याचे प्रमाण अल्प दिसून आले.**
5. **संघ अध्यापनासाठी तुमच्या शाळेतील शिक्षकांमध्ये योग्य समन्वय असण्याचे प्रमाण समाधानकारक दिसून आले.**
6. **संघ अध्यापनात संघ अध्यापन नियोजनात शिक्षक सहभागी होणे टाळण्याचे प्रमाण अधिक दिसून आले.**
7. **संघ अध्यापन नियोजन करताना शालेय शिक्षकांच्या बलस्थानाचा विचार करण्याचे प्रमाण चांगले दिसून आले.**
8. **संघ अध्यापणामुळे अध्यापन अध्ययनाची गुणवत्ता वाढण्यास मदत होते असे बहुसंख्य शिक्षकांना वाटते.**
9. **सांघिक अध्यापनामुळे अध्यापन मनोरंजक व प्रभावी होते असे बहुसंख्य शिक्षकांना वाटते.**
10. **संघ अध्यापनासाठी शिक्षकांना मुख्याध्यापकांकडून प्रोत्साहन मिळण्याचे प्रमाण अल्प दिसून आले दिसून आले.**

*Copyright © 2017, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

**शिफारसी**

1. **शिक्षकांसाठी संघ अध्यापन या विषयांच्या अनुषंगाने संघ अध्यापन जागृकता कार्यक्रमाचे आयोजन करावे**.

2. **मुख्याध्यापकांनी संघ अध्यापनासाठी शिक्षकांना प्रोत्साहन द्यावे**.

3. **शिक्षण संचालनालयाने संघ अध्यापनासाठीसंबंधी शिक्षकांसाठी कार्यशाळा, परिसंवाद, परिषद इत्यादीचे आयोजन करावे**.

4. **शिक्षकांनी संघ अध्यापन विषयी सकारात्मक विचार करावा**.

**संदर्भ**

*शेवतेकर शा. आणि निकुमे (२०११) भारतीय शिक्षण प्रणाली नागपूर विद्या प्रकाशन*
*घोरमोडे के. यु., घोरमोडे क. (२००९) शिक्षकांचे शिक्षण नागपुर विद्या प्रकाशन*
*तापकीर द. लोंढे. गौ. (२००९) विद्यमान शिक्षणातील वनप्रवाह मिरज संघमित्रा प्रकाशन*
*मुळे रा. श., उमाटे वि. (१९९८) शैक्षणिक संशोधनाची मुलतत्वे, महाराष्ट्र ग्रंथनिर्मिती मंडळ नागपूर*

*Copyright © 2017, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*